# अनोळखी व्हिडीओ कॉल उचलू नका

## नितेश बिचेवार यांचे आवाहन

पिंपरी : अनोळखी व्हिडिओ कॉल उचलू नका असे आवाहन सायबर तज्ज्ञ नितेश बिचेवार यांनी केले.

कमला शिक्षण संकुल संचलित प्रतिभा महाविद्यालयात क्विक हिल फाऊंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा व सायबर सुरक्षा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात बिचेवार बोलत होते.

उद्घाटन पिंपरी चिंचवड सायबर सेवेचे पोलीस अंमलदार नितेश बिचेवार व आशा सानप यांच्या हस्ते झाले. यावेळी क्विकहील फाऊंडेशनच्या अधिकारी मृणाल म्हापुसकर प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, विभाग प्रमुख डॉ. जयश्री मुळे, डॉ. हर्षिता वाच्छानी, समन्वयिका प्रा. सुप्रिया गायकवाड आदी उपस्थित होते.



नितेश बिचेवार म्हणाले, इंटरनेट, व्हॉटसअप, युट्युबमुळे माहितीजाळ खुले झाले असली तरी सततच्या मोबाईल हाताळल्यामुळे मुलांच्या व्यक्तिविकासावर, स्वभाव धारणेवर व कौटुंबिक संबंधावर विपरीत परिणाम होत आहे. चुकीचे काम कराल, तर भावी आदर्श आयुष्याला मुकाल, शिक्षण घ्यायला आला आहात तर जे जे आवश्यक आहे तेच घ्या.

सुरक्षितता बाळगणे महत्त्वाचे आहे. फेसबुक प्रोफाइल लॉक करा, पासवर्ड तीन आकडी ठेवू नका, अनोळखी व्हिडीओ कॉल घेऊ नका, सोशल मिडीयावर सातत्याने दक्षता बाळगा अडचण भासल्यास महाराष्ट्र सायबरचा कोर्स आहे, त्याची माहिती आत्मसात करा.

सायबर तज्ज्ञ आशा सानप म्हणाल्या, ऑनलाईन शॉपिंग, शादी डॉटकॉम, नोकरी डॉटकॉम पाहताना, ॲप डाऊनलोड करताना खात्री करावी.

क्रेडीट व डेबिट कार्डद्वारे व्यवहार करताना काळजी घ्यावी. आपला ओटीपी तिऱ्हाईताना शेयर करू नका, ऑनलाईन पेमेंटवरून फसवणूक होऊ शकते. आधारकार्ड, पॅनकार्डचे महत्व समजून घ्यावे.